# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र. ४९/२०२१/जळगांव**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. दयाराम माधव पाटील, मु.पो.एकलहरे, ता.अमळनेर, जि.जळगांव. | सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय अमळनेर, ता.अमळनेर, जि.जळगांव. | गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय अमळनेर, ता.अमळनेर, जि.जळगांव. |

**सुनावणी दिनांक — १७/०१/२०२४**

१. **उपस्थिती —**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| उपस्थित | उपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |

२. **द्वितीय अपील अर्ज —**

(१) द्वितीय अपील अर्जाचा दिनांक : २३/१२/२०२०

(२) द्वितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : मुदतीत अपिल चालविले नाही माहिती मिळाली नाही.

(३) द्वितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : माहिती मिळावी.

३. **माहिती अर्ज —**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : २४/०९/२०२०

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २४/०९/२०२०

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : कालावधी नमूद नाही.

(४ ) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती : जा.पत्र दि.अ/ग्रा.अ/आर.आर२०६/२०१९ पंचायत समिती कार्यालय अमळनेर, जि.जळगांव दि.०३/१२/२०१९ नुसार माझ्या दि.०५/०९/२०१८ रोजी दिलेल्या अर्जाची चौकशी झालेली असल्याचे नमूद केलेले आहे त्या चौकशीच्या अहवालाची प्रत संबंधीतासह मारवड पोलीस मारवड ता.अमळनेर येथे एफ.आय.आर. २०१९ दिनांक ६/११/२०१९ नुसार फौजदारी गुन्हा दाखल केल्याची माहिती कुणाच्या व कोणत्या आदेशाबद्दल गुन्हा दाखल केला त्या

|  |  |  |
|---|---|---|
|  |  | आदेशाची माहिती मिळावी. |
| (५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही | : | कोवीड लॉकडाऊन मध्ये माहिती अर्जा संबंधात सुरुवातीला कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. |

४. **प्रथम अपील -**

|  |  |  |
|---|---|---|
| (१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक | : | ०४/११/२०२० |
| (२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | : | ०४/११/२०२० |
| (३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण | : | माहिती मिळाली नाही. |
| (४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही | : | प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय अमळनेर, ता.अमळनेर, जि.जळगांव. यांनी दि.२४/१२/२०२० रोजी सुनावणी घेवून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना १० दिवसांत माहिती पुरविण्याचे आदेशीत करुन प्रथम अपिल निकाली काढण्यात आले. प्रथम अपिल आदेशात असे नमूद केले आहे की जन माहिती अधिकारी यांनी अर्जदार यांनी मागितलेल्या माहितीतील संबंधितावर यापूर्वीच गुन्हा दाखल झाला आहे. तसेच दि.०८/०१/२०२१ च्या पत्राने कार्यालयात उपलब्ध माहिती रजिष्टर पोस्टाने पाठविली. |

५. **युक्तिवाद/लेखी खुलासा –**

विद्यमान जन माहिती अधिकारी- अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कलम ८(१)(ज) नुसार देय नसल्याचे स्पष्ट केले.

६. **निष्कर्ष –**

१) सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता कलम 8 (1) (ज) नुसार ही माहिती प्रकट केल्याने अपराध्यांचा तपास करणे किंवा त्यांना अटक करणे किंवा त्यांच्यावर खटला दाखल करणे या प्रक्रियांमध्ये अडथळा येणार असल्यामुळे माहिती देय नाही. सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकाऱ्यांनी उपलब्ध माहिती दिली असल्याने प्रस्तुतचे द्वितीय अपिल निकाली काढण्या येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

जावक क्र. अ1-२६५५ 20 SEP 2024